


# साखर कारखान्यांनी सांडपाण्याचा पुनर्वापर करण्याची आवश्यकता : ठोंबरे

## किर्लोस्कर वसुंधरा महोत्सवाअंतर्गत डब्ल्यूआयटीमध्ये कार्यशाळा : २० साखर कारखान्यांचा सहभाग

वार्ताहर

**सोलापूर, दि. १९ ऑगस्ट -**

साखर कारखान्यातून वापर झालेले प्रदुषित पाणी हे साखर कारखाने तसेच सोडून देत आहेत. त्यामुळे पाण्याचे प्रदुषण वाढत आहे. त्यामुळे कारखान्यांनी हे सांडपाणी सोडून न देता त्याचा पुनर्वापर केल्यास मोठ्या प्रमाणात पाण्याचे प्रदुषण टळणार आहे, असे प्रतिपादन उस्मानाबादच्या नॅचरल शुगर फॅक्टरीचे बी.बी. ठोंबरे यांनी केले.

सोलापूरच्या वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालयात किर्लोस्कर वसुंधरा आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवांतर्गत 'पर्यावरण पूरक कारखाना उत्कृष्ट प्रथा' या संदर्भात जिल्ह्यातील साखर कारखान्यांच्या प्रतिनिधींसाठी सादरीकरण आणि कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. त्यावेळी ठोंबरे बोलत होते. यावेळी व्यासपीठावर महोत्सवाचे संचालक विरेंद्र चित्राव, डॉ. एस.पी. वैद्य, प्राचार्य डॉ. एस.ए. हलकुडे, प्रदुषण नियंत्रण मंडळाचे नवनाथ अवताडे आदी उपस्थित होते.

बी.बी. ठोंबरे पुढे म्हणाले, साखर कारखान्याच्या उत्पादन प्रक्रियेत मोठ्या प्रमाणात कच्च्या मालाचा वापर होतो. परंतु उत्पादन झाल्यानंतर अनेक वेस्ट जाळून टाकले जाते तर वापरलेले दुषित पाणी सोडून दिले जाते. हे पाणी वहात नदीत जावून मिसळते. त्यामुळे मोठ्या प्रमाणात नदीच्या प्रदुषणात वाढ होत आहे. यासाठी प्रत्येक साखर कारखान्याने वेस्ट झालेला माल न जाळता त्यावर प्रक्रिया आणि पाण्याचा पुनर्वापरासाठी प्रक्रिया करणे आवश्यक आहे. विशेषत: सोलापूर जिल्ह्याला साखर कारखानदारी ही वरदायीनी आहे. तसेच उजनी धरण आणि भीमा नदी ही जीवनदायीनी आहेत. यांचे प्रदुषण रोखणे महत्त्वाचे आहे, असेही ठोंबरे म्हणाले.

प्रदुषण मंडळाचे अधिकारी अवताडे म्हणाले, समाजात कोणतेही काम लोकसहभागाशिवाय करणे शक्य होत नाही. त्यामुळे प्रदुषण नियंत्रणाच्या कार्यातही लोकसहभाग तितकाच महत्त्वाचा ठरत आहे. प्राचार्य डॉ. हलकुडे यांनी आपल्या भाषणात पर्यावरणाच्या प्रत्येक कार्यात आम्ही सहभागी होऊ असे आश्वासन दिले. यावेळी सोलापूर जिल्ह्यातील वीस साखर कारखानदारांच्या प्रतिनिधींनी आपला कारखाना पर्यावरणपूरक कोणकोणत्या गोष्टी करीत आहेत हे दृकश्राव्य माध्यमाद्वारे सादरीकरण केले. या कार्यशाळेत सहभागी झालेल्या साखर कारखानदारांच्या प्रतिनिधींना सहभाग प्रमाणपत्रांचे मान्यवरांच्या हस्ते वाटप करण्यात आले. प्रा. नरेंद्र काटीकर यांनी सूत्रसंचालन केले.